# ५८ अभय राजकुमार सुत्त

असे मी ऐकले आहे–

एके समयी भगवान राजगृहाजवळील वेळूवनात कलन्दक निवापात विहार करीत होते. तेव्हा अभय राजकुमार जेथे निगंठ नात-पुत्त होते तेथे गेला. जाऊन निगंठ नातपुत्तांना अभिवादन करून एका बाजूला बसला. एका बाजूला बसलेल्या अभय राजकुमाराला निगंठ नातपुत्त म्हणाले–

'ये राजकुमार! श्रमण गौतमांच्या बरोबर वाद (=शास्त्रार्थ) कर. त्यामुळे तुझी कल्याण कीर्ती पसरेल की अभय राजकुमाराने एवढ्या महाऋद्धिक-महानुभाव श्रमण गौतमांच्या बरोबर वाद केला.'

'कोणत्या प्रकारे भन्ते! मी एवढ्या महानुभाव श्रमण गौतमांच्या बरोबर वाद करू?'

'राजकुमार! तू जेथे श्रमण गौतम आहेत तेथे जा. जाऊन श्रमण गौतमांना असे म्हण– काय भन्ते! तथागत असे शब्द बोलू शकतात काय की जे दुसऱ्यांना अप्रिय अमान्य आहेत?' जर असे विचारल्यावर श्रमण गौतम तुला म्हणाले, 'राजकुमार! बोलू शकतात.' तर तू त्यांना असे विचार, 'तर भन्ते! पृथग्जन (=अज्ञ संसारी माणसे) आणि तथागत यांच्यात फरक काय राहिला? पृथग्जन सुद्धा तशी भाषा बोलू शकतात.' जर असे विचारल्यावर श्रमण गौतम तुला म्हणाले, 'राजकुमार! ...* बोलू शकत नाहीत.' तर तू त्यांना असे म्हण, 'आपण देवदत्ताबद्दल अशी भविष्यवाणी का केली आहे की देवदत्त दुर्गतीत जाईल, देवदत्त नरकात

जाईल, देवदत्त कल्पभर नरकात राहील. देवदत्ताच्या बाबतीत इलाज नाही (अचिकित्स्य). आपल्या ह्या बोलण्यामुळे देवदत्त कोपित असंतुष्ट झाला.' राजकुमार! अशा तऱ्हेने दोन बाजू असलेला प्रश्न विचारल्यावर श्रमण गौतम ना गिळू शकेल ना बाहेर काढू शकेल. ज्याप्रमाणे एखाद्या माणसाच्या गळ्यात लोखंडाचा आकडा अडकला असता तो गिळूही शकत नाही आणि काढूही शकत नाही त्याचप्रमाणे...*'

'ठीक भन्ते!' असे म्हणून अभय राजकुमार आसनावरून उठून निगंठ नातपुत्तांना अभिवादन करून दक्षिणा करून, जेथे भगवान होते तेथे गेला. जाऊन भगवन्तांना अभिवादन करून एका बाजूला बसला. बसलेल्या अभय राजकुमाराने सूर्य पाहून (वेळ पाहून) विचार केला 'आज भगवन्तांशी वाद करण्याची वेळ नाही. उद्या आपल्या घरी भगवन्तांच्या बरोबर वाद करीन.' असा विचार करून तो भगवन्तांना म्हणाला—

'भन्ते! भगवानांनी आपल्यासह चार माणसांच्यासाठी उद्या माझे भोजन स्वीकारावे.'

भगवन्तांनी मौन धरून स्वीकार केले. तेव्हा अभय राजकुमार भगवानांची स्वीकृती जाणून, भगवानांना अभिवादन करून, प्रदक्षिणा करून निघून गेला.

ती रात्र निघून गेल्यावर सकाळच्या पहिल्या प्रहरी भगवान वस्त्र नेसून, पात्र चीवर घेऊन जेथे अभय राजकुमाराचे घर होते तेथे गेले. जाऊन मांडलेल्या आसनावर बसले. अभय राजकुमाराने भगवानांना उत्तम खाद्य पदार्थ आपल्या हाताने देऊन तृप्त केले, पूर्ण केले. तेव्हा अभय राजकुमार, भगवानांनी भोजन केलेल्या पात्रापासून हात बाजूला केल्यावर, एक खालचे आसन घेऊन, एका बाजूला बसला. एका बाजूला बसलेल्या अभय राजकुमाराने भगवानांना विचारले—

'काय भन्ते! तथागत अशी भाषा बोलू शकतात काय की जी दुसऱ्यांना अप्रिय आहे, अमान्य आहे?'

'राजकुमार! हे एकांशाने (= अपवाद न सांगता) सांगता येणार नाही.'

'भन्ते! निगंठांचा नाश झाला.'

'राजकुमार! तू असे का बोलतोस— भन्ते! निगंठांचा नाश झाला?'

'भन्ते! मी जेथे निगंठ नात- पुत्त आहेत तेथे गेलो होतो. निगंठ नातपुत्तांना अभिवादन करून एका बाजूला बसलो. एका बाजूला बसलेल्या मला निगंठ नात- पुत्त म्हणाले— राजकुमार...* ...*[1] अशा प्रकारे राजकुमार, दुधारी प्रश्न विचारल्यावर श्रमण गौतम ना गिळू शकतील ना बाहेर काढू शकतील.'

त्या वेळी अभय राजकुमाराच्या मांडीवर एक अगदी लहान मुलगा बसला होता. तेव्हा भगवान अभय राजकुमाराला म्हणाले—

'तुला काय वाटते राजकुमार! तुझ्या किंवा दायीच्या चुकीमुळे जर ह्या मुलाने आपल्या तोंडात एखादा लाकडाचा किंवा दगडाचा तुकडा घातला तर तू त्याला काय करशील?'

'काढून टाकेन भन्ते! जर भन्ते! मी पहिल्यावेळी सहजगत्या काढू शकलो नाही तर डाव्या हाताने डोके पकडून उजव्या हाताने बोट वाकडे करून, रक्त आले तरी, काढून टाकेन.'

'कारण काय?'

'भन्ते, मला मुलाबद्दल दया आहे.'

'त्याप्रमाणे राजकुमार! जे बोलणे, वस्तुस्थितीप्रमाणे नाही, सत्य नाही अर्थयुक्त नाही असे तथागत जाणतात, आणि जे दुसऱ्यांना अप्रिय आहे, अमान्य आहे, असे बोलणे तथागत बोलत नाहीत. २) जे बोलणे वस्तुस्थितीप्रमाणे आहे, सत्य आहे पण अनर्थक आहे असे ते जाणतात, आणि जे दुसऱ्यांना अप्रिय आहे, अमान्य आहे, असे बोलणे तथागत बोलत नाहीत. ३) जे बोलणे वस्तुस्थितीप्रमाणे आहे, सत्य आहे, सार्थ आहे असे जाणतात, (बोलण्याला) योग्य काळ आहे असे जाणल्यावर तथागत त्या वचनाला बोलतात. ४) जे बोलणे वस्तुस्थितीप्रमाणे नाही, सत्य नाही, अर्थयुक्त नाही असे जाणतात, आणि जे दुसऱ्यांना प्रिय आहे, मान्य आहे त्या वचनाला तथागत बोलत नाहीत. ५) जे बोलणे वस्तुस्थितीप्रमाणे आहे, सत्य आहे, सार्थ आहे हे ते जाणतात, आणि ते जरी दुसऱ्यांना प्रिय असले, मान्य असले तरी (बोलण्याला) योग्य काळ आहे असे जाणल्यावर तथागत त्या वचनाला बोलतात. कारण काय? राजकुमार! तथागतांना प्राण्यांच्यावर अनुकंपा आहे.'

'भन्ते! जे हे क्षत्रिय पण्डित, ब्राह्मण पण्डित, गृहपती पण्डित, श्रमण पण्डित प्रश्न तयार करून तथागतांच्या जवळ येऊन विचारतात– भन्ते! काय भगवान पहिल्यांदाच मनात विचार करून ठेवतात की 'जर मला कोणी असे येऊन विचारले तर त्यांच्या अशा विचारण्यावर मी असे उत्तर देईन?'

'राजकुमार! तुलाच हे विचारतो, तुला जसे सुचेल त्या प्रमाणे तू उत्तर दे. तर राजकुमार! काय तू रथाच्या अंगप्रत्यंगामध्ये चतुर आहेस?'

'होय भन्ते! मी रथाच्या अंगप्रत्यंगामध्ये चतुर आहे.'

'तर राजकुमार! जर तुझ्याजवळ येऊन हे विचारले– 'हा रथाचा कोणता भाग आहे?' तर तू पहिल्यांदाच असा विचार करतोस का की 'जर मला कोणी येऊन असे विचारले तर, त्यांच्या अशा विचारण्यावर मी असे उत्तर देईन; की त्या क्षणीच तुला असे वाटत असते?'

'भन्ते! मी रथिक आहे. रथाच्या अंगप्रत्यंगाचा मी प्रसिद्ध जाणकार, चतुर आहे. रथाचे सर्व अंगप्रत्यंग मला चांगले माहीत आहे. तेव्हा त्याच क्षणी मला ते सुचत असले पाहिजे.'

'त्याचप्रमाणे राजकुमार! जे ते क्षत्रिय पण्डित, ब्राह्मण पण्डित, गृहपती पण्डित, श्रमण पण्डित, प्रश्न तयार करून तथागतांच्या जवळ येऊन विचारतात, त्याच क्षणी ते तथागतांना सुचत असते. कारण काय? राजकुमार! तथागतांचे धर्मधातु (= मनाचे विषय) चांगल्या तऱ्हेने मर्म जाणतात. त्या धर्म धातूंनी चांगल्या तऱ्हेने मर्म जाणल्यामुळे त्याच क्षणाला ते सुचत असतात.'

असे म्हटल्यावर अभय राजकुमार भगवानांना म्हणाला– 'आश्चर्य! भन्ते! अद्‌भुत! भन्ते!...* ज्याप्रमाणे उलटे असलेले सरळ करावे...*[१] आजपासून भगवन्तांनी मला शरणागत उपासक म्हणून समजावे.'